International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 39 September - October - 2025

# सोशल मीडिया आणि वेब सेवा: शैक्षणिक ग्रंथालयातील नवे प्रवाह

**श्रीमती नितल विलास हरुगडे**
*ग्रंथपाल,*
*एन. डी. पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स,सांगली*
*Corresponding Author – श्रीमती नितल विलास हरुगडे*
**DOI - 10.5281/zenodo.17282884**

***सारांश:***

*शैक्षणिक ग्रंथालये केवळ ज्ञानाचे जतन, संवर्धन करणारी ठिकाणे राहिली नसून काळानुरूप माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ती डिजिटल संवादाची केंद्र बनली आहेत. ग्रंथालयाची पूर्वी जी पारंपरिक भूमिका होती,जसे पुस्तकांना केंद्रबिंदू मानून त्याभोवती ग्रंथालयाच्या सर्व सेवा वाचकांपर्यंत पोहचत होत्या त्यामध्ये आता आमूलाग्र बदल झाला आहे. ग्रंथालये केवळ माहिती देणारी संस्था न राहता वापरकर्त्यांची डिजिटल ओळख घडविण्यात महत्त्वाचे सहकार्य करत आहे. फेसबुक,ट्विटर, व्हॉट्सॲप, तसेच झूम, वेबीनार ,गुगल मीट या या सोशल माध्यमांचा योग्य तो उपयोग करून ग्रंथपाल त्यांच्या सेवांची तसेच नवीन संसाधनाची, शैक्षणिक उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत आहे. नव्या पिढीतील विद्यार्थी आणि इतर वापरकर्ते त्यांचा अधिकतर वेळ स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मीडिया यामध्ये घालवत आहे. त्यामुळे ग्रंथपाल सोशल मीडियाचा वापर करून त्यांच्याशी प्रभावी संवाद साधू शकतात. ट्विटरवर वा फेसबुकची माहिती प्रसार प्रक्रिया विद्यार्थ्यांना अद्ययावत ठेवते; तर वेब-आधारित OPAC, ई-लर्निंग मॉड्यूल्स, ऑनलाइन रेफरन्स सेवा विद्यार्थ्यांना २४x७ ज्ञानसहयोग पुरवतात. ग्रंथालयातील सोशल मीडिया आणि वेब सेवांच्या या नवीन प्रवाहामुळे विद्यार्थी, अध्यापक, संशोधक यांचा शोधक दृष्टिकोन अधिक मजबूत आणि योग्य दिशेने प्रवाहित होत आहे. सोशल मीडिया आणि वेब सेवांमुळे ग्रंथालयानी भौतिक मर्यादेचे अडथळे ओलांडून वापरकर्त्यांना ग्लोबल नेटवर्कचे मार्ग खुले करून दिले आहेत. थोडक्यात, शैक्षणिक ग्रंथालयांची भूमिका आता फक्त संग्रहणापासून पुढे जाऊन संवाद, नवसृजन व सहशोधाची दिशा दाखवणारी ठरली आहे.*

***शोध संज्ञा: सोशल मीडिया, सोशल नेटवर्क, डिजिटल लायब्ररी, शैक्षणिक ग्रंथालय, ग्रंथपाल***

**प्रस्तावना :**

शैक्षणिक ग्रंथालयाची पूर्वीपासूनची जी भूमिका होती,ती म्हणजे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांना ज्ञान,संशोधन,आजीवन शिक्षण यासाठी क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, विविध विषयावरील नियतकालिके,आणि भौतिक साधने गरजेनुसार पुरविणे. शैक्षणिक ग्रंथालय ही कायम महाविद्यालय, विद्यापीठे यांच्या केंद्रस्थानी राहिली आहेत. परंतु एकविसाव्या शतकात माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शैक्षणिक ग्रंथालयाच्या भूमिकेमध्ये आमुलाग्र बदल झाला आहे. पूर्वी ग्रंथालयात आलेली नवीन पुस्तके, ग्रंथालयीन सूचना, तसेच ग्रंथालयीन उपक्रम या या गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना सूचनाफलक,परिपत्रके याद्वारे मिळत होती. परंतु आज ही माहिती सोशल

मीडियाच्या उदयामुळे घरबसल्यादेखील विद्यार्थ्यांना मिळते. फेसबुक, व्हाट्सअप,इंस्टाग्राम, यासारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म विद्यार्थी, ग्रंथपाल यांच्या रोजच्या जीवनातील अविभाज्य भाग झाले आहेत. ही साधने केवळ मनोरंजन, संवादापुरती मर्यादित न राहता शैक्षणिक सहकार्यासाठी उपयोगी पडत आहेत. ग्रंथांचे पालन करताना ग्रंथपाल डिजिटल मार्गदर्शक, माहितीचा व्यवस्थापक इ. कार्ये सोशल मीडियाचा वापर करून आपल्या वापरकर्त्यांपर्यंत ही माहिती पोहोचवणे हे काम चोखपणे करू लागला आहे. संपूर्ण जगात कोरोना सारख्या संसर्गजन्य रोगामध्ये जेव्हा पूर्ण जगाला घरी बसावे लागले त्याचा परिणाम शैक्षणिक क्षेत्रावर देखील विपरीत झाला. ग्रंथालयातील सेवा प्रत्यक्ष उपलब्ध करून देणे कठीण झाल्यानंतर ग्रंथपालांनी संकटात देखील सोशल मीडियाच्या आधारे संधी शोधल्या. डिजिटल ग्रंथालय आणि इतर ग्रंथालयीन सेवा या सोशल मीडियाचा उपयोग करून दूर बसलेल्या वाचकांपर्यंत पोहोचवल्या देखील. यामध्ये व्हाट्सअप, युट्युब, टेलिग्राम, फेसबुक, यासारख्या सोशल मीडियाचा वापर करून महत्त्वाच्या सूचना, विविध उपक्रम, तज्ञांची व्याख्याने, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी महत्त्वाच्या ग्रंथालयीन सेवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात ग्रंथपाल यशस्वी ठरले. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक, संशोधक यांच्या कार्यस्थानापर्यंत माहिती पुरविण्यात सोशल मीडिया प्रभावी ठरत आहे. ग्रंथालय व माहिती केंद्रे आणि त्यांचे वापरकर्ते यांच्यातील संवाद तसेच वेव आधारित ग्रंथालयीन सेवा या सामाजिक माध्यमातून सक्षमरित्या प्रस्थापित होत आहेत. आपल्या वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथपालाला मल्टीमीडियाचा वापर करून तसेच सोशल मीडियाचा आधार घेऊन काम करणे, ही आजच्या काळातली गरजच आहे. माहितीच्या युगात या सर्व प्रक्रियेसाठी ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचारी आणि ओघाने वाचक यांचे काम सोशल मीडिया वापरून सुलभ, जलद आणि त्वरित होत आहे. पूर्वीपासून ग्रंथालय ना नफा ना तोटा या तत्त्वावर त्यांच्या सेवा देत असून आज फक्त त्याचे स्वरूप बदलले आहे. ग्रंथालये पारंपरिक सेवेबरोबरच वेब आधारित ग्रंथालीन सेवा वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत. या सर्व प्रक्रियेत ग्रंथालय सोशल मीडियाचा आधार घेऊन, तसेच मल्टीमीडिया वापरून ग्रंथालीन सेवा आणि त्याबरोबरच आधुनिक पद्धतीने वेब आधारित सेवा वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत याचा आढावा आपण या शोधनिबंधात घेणार आहोत.

**शैक्षणिक ग्रंथालयाची कार्ये:**

- संशोधनाला चालना देणे
- अभ्यास व अध्यापनास सहाय्य्य करणे
- संदर्भ सेवा पुरवणे
- वापरकर्त्यानां मार्गदर्शन
- ज्ञानसपंदा जपणे

**शैक्षणिक ग्रंथालय:**

शैक्षणिक ग्रंथालय हे संस्थेचे हृदय असून तेथूनच माहिती ज्ञान संशोधनाची ऊर्जा सक्रिय राहून संपूर्ण संस्था विकास करत असते. "**अनिल धिमान व सुरेश सिन्हा यांनी त्यांच्या Academic Libraries या पुस्तकात म्हटले आहे की, "हे शैक्षणिक संस्थांशी संलग्न असणारे ग्रंथालय आहेत जे अभ्यासक्रम प्रशासन सेवा." आणि स्वयंचलन या सर्व पैलूंमध्ये कार्यरत असतात."** आजच्या डिजिटल ज्ञानयुगात ग्रंथालय आणि सोशल मीडिया हातात हात घालून काम करत आहेत त्यांना जोडणारा दुवा म्हणजे ग्रंथपाल

होय. पुस्तके, नियतकालिके, संदर्भ सेवा, या भौतिक सुविधांसोबत विविध सोशल नेटवर्क आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या प्रभावामुळे ग्रंथालयाच्या भूमिकेत आमुलाग्र बदल झाला आहे. महाविद्यालयात शारीरिक उपस्थिती, समोरासमोरील संवाद तसेच प्रत्यक्ष मार्गदर्शन या पूर्वी अनिवार्य असलेल्या गोष्टींचा अडथळा आज सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाने दूर झाला आहे. आज समाजातील प्रत्येक वर्ग सामाजिक माध्यमांचा वापर करत आहे तिथे महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा सोशल मीडियावर खर्च होणारा वेळ अंमळ जास्तच आहे. अशावेळी सोशल मीडिया आणि नेटवर्कचा वापर करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात खेचून आणणारे आणि त्यांची ऊर्जा योग्य ठिकाणी खर्च करायला भाग पडणारे ग्रंथपाल, हे त्यांच्या कुशलतेचेच प्रतीक आहे.

## सोशल मीडिया:

सामाजिक माध्यमे म्हणजे माहिती, विचार, कल्पना व अनुभवांची देवाणघेवाण करून लोकांमध्ये संवाद व परस्पर संबंध निर्माण करणारी ऑनलाईन साधने होय. सोशल मीडियाची मरियम वेबस्टर यांनी केलेली व्याख्या “सोशल मीडिया म्हणजे इलेक्ट्रॉनिक संवादाची अशी साधने (जसे की सोशल नेटवर्किंग आणि मायक्रो ब्लोगिंग साठी असलेली संकेतस्थळे) ज्याद्वारे वापरकर्ते ऑनलाइन समुदाय निर्माण करून, माहिती, कल्पना, वैयक्तिक संदेश, तसेच व्हिडिओसारखी इतर सामग्री एकमेकांशी शेअर करतात.” नितेश चोरे हे त्यांचा ‘Use of social media in academic libraries’ या शोधनिबंधामध्ये असे म्हणतात की, “सोशल मीडिया हे ग्रंथालय वापरकर्त्यांपर्यंत पोहोचण्याचे सर्वोत्तम माध्यम आहे कारण त्याद्वारे माहिती सहजपणे वाटली व मिळवली जाऊ शकते”तसेच ते पुढे म्हणतात की “संभाव्य वापरकर्त्यांशी संपर्क साधण्यासाठी सोशल मीडिया एक लवचिक व्यासपीठ बनली आहे”

## सोशल मीडिया आधारित ग्रंथालयीन सेवांचा उद्देश:


1) वेळेवर संप्रेषण करणे
2) वापरकर्त्यांच्या सहभाग वाढविणे
3) सामाजिक माध्यम साक्षरतेस प्रोत्साहन देणे
4) आभासी समुदाय निर्माण करणे
5) ग्रंथालयाची दृश्यमानता वाढविणे
6) ग्रंथालयातील साधनसामग्री आणि सेवांचा प्रचार करणे

## सोशल मीडिया साक्षरता:

शैक्षणिक ग्रंथालयातील ग्रंथपाल व वाचक यांच्याकडून सोशल मीडिया वापरताना माहिती साक्षरते एवढीच सोशल मीडिया साक्षरता माहित असणे आवश्यक आहे. यूनेस्कोच्या व्याख्येनुसार आणि मीडिया अँड इन्फॉर्मेशन लिटरसी (MIL) च्या आधारे सोशल मीडिया साक्षरता अशी परिभाषित करता येते : **“ही अशी कौशल्यांची अवस्था आहे जी नागरिकांना विविध साधनांचा वापर करून सर्व स्वरूपातील माहिती व माध्यमातील आशयाचा प्रवेश करणे, प्राप्त करणे, समजून घेणे, मूल्यमापन करणे व वापरणे, तसेच माहिती व माध्यमातील आशयाची निर्मिती करणे आणि वाटप करणे या सर्व गोष्टींमध्ये समीक्षात्मक, नैतिक आणि परिणामकारक पद्धतीने सक्षम करते, ज्यामुळे ते वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक कार्यांमध्ये सहभागी होऊन सक्रीय राहू शकतात.”** ग्रंथपाल हा सोशल मीडियाच्या साहाय्याने ग्रंथालीन सेवा व साधने आणि उपक्रमाचा प्रचार करू शकतो तसेच वाचकांना सोशल मीडियाचा वापर जबाबदारी व नैतिकतेने

करण्याचे मार्गदर्शन करतो. शैक्षणिक ग्रंथपाल कॉपीरराईट कायद्याची माहिती सूचनाफलक, ग्रंथालयाची वेबसाईट, ई-मेल,वापरकर्ता मार्गदर्शिका पुस्तिका यांच्या माध्यमातून वापरकर्त्यांकडून योग्यरित्या पोहोचवतो. महाविद्यालयीन वाचक देखील ऑनलाईन माहिती मिळवून खरी आणि खोटी माहिती शोधण्याचे कौशल्य वाढवू शकता. केवळ पारंपरिक सेवेच्या मर्यादेत न राहता ग्रंथालयांनी त्यांचा व वापरकर्त्यांचा संवाद साधण्यासाठी,वाचकांच्या सहभागासाठी तसेच माहितीच्या प्रचारासाठी सोशल मीडियाचा वापर सुरू केला आहे. सोशल मीडियाच्या मदतीने ग्रंथालये विद्यार्थी व प्राध्यापक यांच्याशी तात्काळ संपर्क करू शकतात आणि परस्पर संवाद ही साधू शकतात. यामुळे ग्रंथालय आणि वापकर्ते यांच्यातील भौगोलिक अंतराची दरी मिटते आणि मिळणारी माहिती ही काळ, वेळ यांचा अडथळा न येता कुठेही उपलब्ध होऊ शकते. ग्रंथालयांमध्ये सोशल मीडियाचे विविध प्लॅटफॉर्म म्हणजे फेसबुक, ट्विटर, यूट्यूब, लिंकडाईन , व्हाट्सअप,टेलिग्राम, ब्लॉग इत्यादी माध्यमे वैयक्तिक तसेच समुदायासाठी वापरले जाऊ लागले. तर गुगल मीट, वेबिनार, झूम या साधनांचा वापर ग्रंथालयामध्ये ऑनलाइन व्याख्याने, ई संसाधनाचे प्रशिक्षण, दुरस्थ वापरकर्त्यांसाठी सेवा तसेच विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्याशी सहज संवाद साधण्यासाठी होतो. ग्रंथालय मध्ये वापरणाऱ्या सोशल मीडियाच्या पुढे आढावा घेतलेले आहे

**सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स:**




**फेसबुक:** फेसबुक चा शोध मार्क झुकेरबर्ग यांनी फेब्रुवारी २००४ रोजी लावला.फेसबुक हे ऑनलाइन संवाद फोटो व्हिडिओ शेअर करण्याचे माध्यम आहे. फेसबुकमुळे ग्रंथालये वापरकर्त्यांपर्यंत भौगोलिक भिंती पलीकडे पोहोचत आहेत. ग्रंथालयीन सूचना, नवीन पुस्तके, ग्रंथालीन उपक्रम, इत्यादी माहिती फेसबुक वरून विद्यार्थ्यांपर्यंत दिली जात आहे.तसेच ग्रंथ प्रदर्शन,कार्यशाळा, वाचन प्रेरणा दिवस, तज्ञांची व्याख्याने इत्यादी माहिती फेसबुकवर पोस्ट करून अधिकाधिक वाचकांना सहभागी करता येते. फेसबुक वरील कमेंट आणि मेसेज द्वारे ग्रंथालय वापरकर्त्यांचे प्रश्न, शंका व सूचना ग्रंथपालाला त्वरित हातात येतात.

**ट्विटर:** ट्विटरची मूळ कल्पना जॅक डोर्सी, बिझ स्टोन, इव्हान विल्यम्स आणि नोआ ग्लास यांनी 2006 मध्ये मांडली.ट्विटर या माध्यमातून लहान संदेश लोकांच्या पर्यंत जलद पोहोचवली येऊ शकतात. तसेच ग्रंथालय वाचकांशी थेट संवाद साधू शकते आणि त्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तर देऊ शकते. यामुळे ग्रंथालयाची डिजिटल उपस्थिती वाढते आणि तरुण वाचक ही प्रोत्साहित होतात.

**इन्स्टाग्राम:** इन्स्टाग्रामचा केविन सिस्ट्रॉम आणि माईक क्रिगर यांनी 6 ऑक्टोबर 2010 रोजी सुरू केले. इन्स्टाग्राम प्रामुख्याने फोटो व व्हिडिओ शेअर करून लोकांशी संवाद व नेटवर्किंग करण्याचे सामाजिक माध्यम आहे. ग्रंथालयात नवीन आलेली पुस्तके, नियतकालिके ई-संसाधने यांची माहिती इन्स्टाग्राम पोस्ट वरून मिळू शकते. तसेच ग्रंथालय इन्स्टाग्राम वरून पुस्तकाच्या शिफारशी किंवा वाचनविषयक फोटो पोस्ट केल्याने विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होते.

**युट्युब:** युट्युब फेब्रुवारी 2005 मध्ये चॅड हर्ले, स्टीव्ह चेन आणि जावेद करीम यांनी शोधला. युट्युब ही गुगल कडून विकसित केलेली मुक्त ऑनलाईन व्हिडिओ शेअरिंग सेवा आहे. ग्रंथपाल याचा वापर माहिती प्रसार, प्रशिक्षण व सेवा देण्यासाठी करतात जसे की एन लिस्ट चा वापर कसा करावा याचा व्हिडिओ बनवून ग्रंथालय विभागाने युट्युब चॅनेलवरवर टाकल्यास एकाच वेळी प्राध्यापक व विद्यार्थी यांना प्रशिक्षण मिळते. तसेच ग्रंथालयीन उपक्रम आणि ग्रंथालय तर्फे आयोजित केले जाणारे वेबिनार यू ट्यूब वर विद्यार्थ्यांना संदर्भासाठी दीर्घकाळ पाहता येतात. ग्रंथपाल विविध शैक्षणिक विषयावर विविध युट्युब चॅनेल्स विद्यार्थ्यांना सुचवू शकतात, याचा विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना उपयोग होतो.

**लिंकडाइन:** लिंकडाइन ची स्थापना रीड हॉफमन यांनी 2002 मध्ये केली आणि 2003 मध्ये ती सुरु झाली. लिंकडाइन हे व्यावसायिक सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्म आहे. मुख्यत: याचा वापर ग्रंथपाल व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करून ती वाढविणे, तसेच विविध क्षेत्रातील तज्ञ आणि इतर शैक्षणिक संस्थांशी जोडण्यासाठी करतात. जसे की ग्रंथपाल इतर ग्रंथालय व्यावसायिक,लेखक, प्रकाशक आणि संशोधक यांच्याशी लिंकडाइनद्वारे जोडले जाऊ शकतात. नोकरीच्या संधी शोधण्यासाठी ग्रंथपालांसाठी आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांसाठी नोकरी शोधण्यासाठी या प्लॅटफॉर्म चा उपयोग होतो.

**व्हॉट्सअ‍ॅप:** व्हॉट्सअ‍ॅप हे ब्रायन एक्टन आणि जान कौम यांनी 2009 साली विकसित केले. व्हॉट्सअ‍ॅप हे मोफत आणि सर्वाधिक लोकप्रिय मेसेजिंग ॲप आहे. या माध्यमातून ग्रंथपाल विद्यार्थ्यांशी वैयक्तिक तसेच सामूहिक संपर्क करू शकतात. व्हॉट्सअ‍ॅपद्वारे ग्रंथपाल विद्यार्थ्यांना कार्यशाळा, वाचन उपक्रम, सेमिनार तसेच इतर ग्रंथालय सूचना त्वरित पाठवू शकतात. नवीन पुस्तके, ई-बुक्स ई-जर्नल्स गरजेप्रमाणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवतात. ग्रंथपाल व्हॉट्सॲ पद्वारे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्याशी सतत जोडलेले राहतात. विद्यार्थी वर्ग प्रत्येक वेळी ग्रंथालयात न जाता त्यांच्या शंका ऑनलाईन व्हॉट्सअ‍ॅप करून देखील सोडवू शकतात. या माध्यमातून ग्रंथपाल ,विद्यार्थी, संशोधक,प्राध्यापक या सर्वांचा वेळ खूप वाचू शकतो.

**टेलिग्राम:** टेलीग्रामची स्थापना 2013 साली पावेल दुरोव्ह आणि निकोलाय दुरोव्ह यांनी केली. टेलिग्राम हे देखील क्लाऊडवर आधारित इन्स्टंट मेसेजिंग ॲप आहे.व्हॉट्सअ‍ॅप प्रमाणेच टेलिग्राम काम करते. टेलिग्राम हे सोशल माध्यम वापरण्यास सुरक्षित जलद व सोपे देखील आहे. ग्रंथपाल विषयवार तसेच विद्यार्थ्यांचे

गट बनवून ई-पुस्तके व इतर सामग्री त्यांच्यापर्यंत टेलिग्राम द्वारे पोहोचू शकतो

**ब्लॉग:** ब्लॉगची संकल्पना १९९४ साली जॉर्ज सिमॉन आणि जॉन बर्गर ( यांनी लोकप्रिय केली. परंतु, "ब्लॉग" हा शब्द १९९७ साली जॉन बर्गर यांनी "weblog" या शब्दातून तयार केला. ब्लॉग हे ऑनलाइन जर्नल किंवा संकेतस्थळ आहे. ब्लॉग्ज द्वारे एखादी व्यक्ती किंवा संस्था नियमितपणे माहिती,कल्पना, मते प्रकाशित करत असते. जशी की ग्रंथपाल भारतातील/जगातील थोर पुरुषांचे योगदान याची माहिती ब्लॉग्ज द्वारे नियमितपणे वाचकांपर्यंत पोहोचू शकतो. तसेच विद्यार्थ्यांपर्यंत यशोगाथा, उपक्रम, योगदान,ग्रंथालय शास्त्रातील प्रवाह ब्लॉग्स वर शेअर करू शकतो. काही ब्लॉग इतके माहितीपूर्ण आणि आणि वैचारिक असतात की विद्यार्थी त्या ब्लॉगच्या साखळीची आतुरतेने वाट बघतात.

**गुगल मीट:** गुगल मीट हे गुगल कंपनीने 2017 मध्ये तयार केलेली ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सेवा आहे. कोरोना काळामध्ये याचा वापर शैक्षणिक क्षेत्रामध्ये जास्त वाढला. यामध्ये विद्यार्थी व ग्रंथपाल पुस्तके, संशोधन लेख यावर ऑनलाईन चर्चा करू शकतात. एखाद्या प्रकल्पाची माहिती ग्रंथपाल विद्यार्थ्यांना देऊ शकतात. वेळेचे बचत आणि दूरस्थ विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवणे हा त्याचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

**वेबिनार:** वेबिनार हा शब्द वेब + सेमिनार यांच्या संयोगातून बनलेला आहे. ऑनलाइन सेमिनारची तांत्रिक कल्पना अनेक कंपन्यांनी विकसित केली; पण "वेबिनार " हा शब्द औपचारिकरित्या १९९८ मध्ये एरिक आर. कॉर्ब आणि ॲलन एम. कुल्प प्रचलित केला. ग्रंथपाल विषयतज्ञांना आमंत्रित करून ग्रंथालय कर्मचारी व विद्यार्थ्यांना माहिती साधने, डिजिटल लायब्ररी कशी वापरावी याचे प्रशिक्षण वेबिनार आयोजित करून देऊ शकतात. ज्यामध्ये वापरकर्ते संवाद साधू शकतात तसेच प्रश्न देखील विचारतात. वेबीनारचे रेकॉर्डिंग करून ग्रंथपाल भविष्यातील संदर्भासाठी ठेवू शकतात.

**झूम:** झूम ची निर्मिती चिनी-अमेरिकन संगणक अभियंता एरिक युआन यांनी केली व 2013 मध्ये वापरकर्त्यांसाठी उपलब्ध झाले.. झूम हे व्हिडिओ कॉन्फरन्स संवादाची नेटवर्क आहे याचा महाविद्यालयात प्रामुख्याने व्याख्याने चर्चा यासाठी उपयोग होतो. झूम प्लॅटफॉर्म विद्यार्थ्यांना दुरस्थ पद्धतीने संवाद साधण्यासाठी उपयोगी ठरते.

सध्याच्या या डिजिटल माहिती युगात ग्रंथालय म्हणते पारंपरिक सेवेबरोबरच इंटरनेटचा वापर करून वेब आधारित ग्रंथालय सेवा दिल्या जातात. यामध्ये प्रत्यक्ष हजर नसताना देखील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांना ई-पुस्तके, ई-आर्टिकल्स, ई-डेटाबेस, ई-संदर्भ साहित्य, डिजिटल संग्रह उपलब्ध करून दिला जातो. या सेवांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वेळेची बचत, भौगोलिक मर्यादांचा अडथळा येत नाही,तात्काळ माहिती उपलब्ध होते. ऑनलाइन संदर्भ साहित्य व शोध साधने संशोधन प्रक्रियेला गती देतात. वेब आधारित सेवांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे या पर्यावरण पूरक आहेत कारण त्या कागदाची गरज कमी करतात.

**वेब आधारित ग्रंथालयीन सेवा:**

**डिजिटल लायब्ररी/ ई लायब्ररी:** पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके, प्रबंध, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑडिओ-व्हिडिओ साहित्य, डेटाबेस इत्यादींचा समावेश असणारी डिजिटल लायब्ररी म्हणजे माहिती व ज्ञान संगणक, इंटरनेट व इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सुलभतेने

उपलब्ध करून देणारी आधुनिक लायब्ररी. वापर करताना यातील माहिती वेळेचे बंधन न पाळता तसेच भौगोलिक मर्यादांचे अडथळा दूर करून वापरता येते.डिजिटल लायब्ररी मुळे विद्यार्थी, संशोधक यांना माहिती व lसंशोधन साहित्याची देवाण-घेवाण सुलभ होते. ग्रंथपाल आणि संसाधनकर्ते यांचा वेळ श्रम व खर्चाची देखील बचत होते. ई-लायब्ररी म्हणजे पारंपरिक ग्रंथालयाचा आधुनिक डिजिटल पर्याय होय.ई-लायब्ररी ही सहज उपलब्ध होणारी व कार्यक्षम अशी आधुनिक ग्रंथालयांशी जुळलेल्या सर्व घटकांना एक वरदान ठरते. सांगलीतील नामांकित संस्था लठ्ठे एज्युकेशन सोसायटी मधील ग्रंथालयांमध्ये LES Digital Library Mobile Application ही सुविधा दिली जाते. यामध्ये प्रश्नपत्रिका, ई-पुस्तके, अभ्यासक्रम, लिंक्स इ.दिल्या जातात. याचा विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांना देखील उपयोग होतो.

**ऑनलाइन डेटाबेस:** माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात ग्रंथालयांमध्ये ऑनलाइन डेटाबेसचा वापर केला जात आहे. या डेटाबेस मधून विद्यार्थी प्राध्यापक यांच्यासाठी गरजेनुसार माहिती, अहवाल, ई-जर्नल, ई-बुक्स, उपलब्ध होतात. विशेषतः संशोधकांना या डेटाबेसच्या साह्याने जागतिक पातळीवरील ज्ञान वृद्धिंगत करता येते. ऑनलाइन डेटाबेसमध्ये शोध,डाउनलोडिंग, तसेच संदर्भ देण्याची सुविधा उपलब्ध होते. जसे की कायद्याचे विद्यार्थी MANUPATRA Legal Database वापरतात.

**ओपॅक:** ओपॅक (OPAC-Online Public Access Catalogue) प्रणाली भारतात INFLIBNET (Information and Library Network Centre, गांधीनगर, गुजरात) या संस्थेमार्फत सुरू करण्यात आली. यूजीसी अंतर्गत इन्फ्लिबनेटने ओपॅक ग्रंथसूची प्रणाली विकसित केली. त्यांचे हेच कार्य आज सर्व महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये एक महत्त्वाची डिजिटल सेवा ठरलेली आहे. ओपॅकमुळे विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक यांना ग्रंथालयातील सर्व ग्रंथांची माहिती एका क्लिकवर कळते. ग्रंथालयामध्ये ग्रंथ शोधण्यासाठी जी पारंपारिक तालिका पद्धत होती, त्यासाठी ओपॅक हे सर्वात चांगला, आधुनिक, वेब आधारित सेवेचा पर्याय ठरलेला आहे. यामध्ये वापरकर्त्याला पुस्तकाचे नाव, लेखक, प्रकाशक, विषय यांच्या आधारे पुस्तकाची, नियतकालिकाचे, प्रबंधाची माहिती शोधता येते.

**ओपन ॲक्सेस जर्नल्स:** जी संशोधनपर किंवा शैक्षणिक नियतकालिके कोणत्याही शुल्काशिवाय सर्वांना वाचण्यासाठी ,डाऊनलोड होण्यासाठी, त्याचा वापर करण्यासाठी उपलब्ध होतात त्यांना ओपन ॲक्सेस जर्नल असे म्हणतात. यांचे मुख्य वैशिष्ट्य ही मोफत असल्यामुळे याचा वापर करणाऱ्यांना आर्थिक अडथळा राहत नाही, तसेच जागतिक स्तरावर कोणीही याचा वापर करू शकते. परंतु हायब्रीड मॉडेलमध्ये काही लेख ओपन ॲक्सेस असतात तर काहींसाठी शुल्क भरावे लागते. DOAJ (Directory of Open Access Journals) ही एक मोफत ऑनलाइन निर्देशिका आहे .यात विविध विषयांवरील समकक्ष पुनरावलोकन केलेली ओपन ॲक्सेस नियतकालिके समाविष्ट आहेत.

या वेब आधारित सेवांमुळे शैक्षणिक व संशोधन साहित्य वापरकर्त्यांना उपलब्ध होत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची माहिती संशोधकांना मिळेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ई लर्निंग आणि ऑनलाईन कोर्स साठी या सेवा उपयुक्त ठरतील. ऑनलाइन ग्रंथालयातील माहिती सतत अद्यावत ठेवल्यामुळे याचा संशोधनासाठी वापर मोठ्या प्रमाणावर राहील. डेटा चोरीला जाऊ नये म्हणून उच्च

दर्जाचे सुरक्षा बाहेर राबवले जातील पर्यायने वापरतात त्यांची माहिती सुरक्षित राहील.

**निष्कर्ष:**

ग्रंथालय मध्ये पारंपारिक सेवा व वेब आधारित सेवा सोशल मीडियाचा उपयोग करून ग्रंथपाल विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांना देतो त्यामुळे वेळेची बचत भौगोलिक मर्यादा यातील अडथळे दूर झाले आहेत तसेच या ग्रंथालय सेवा कागदाचा वापर न केल्याने पर्यावरण पूरक देखील आहेत. भौतिकमर्यादे पलीकडे वापरकर्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच डिजिटल संसाधनाचा सहज प्रवेश देण्यासाठी ग्रंथपालांना मल्टीमीडिया, इंटरनेट ई-संग्रह, प्रशिक्षित ग्रंथालय कर्मचारी, आणि आवश्यक सॉफ्टवेअर यांच्या गरजेबरोबरच सर्वात महत्त्वाचं म्हणजे निधी लागणार आहे.

**संदर्भ यादी:**


1) Diman, Anil.K and Sinha,Suresh C. Academic Libraries (ESS ESS Publication 2002)
2) Khot, Namita Quality and Excellence of Academic Libraries Shruti Publication, Jaipur 2013
3) Dalal, Mamta Modern Communication with Social media (BPB Publication, New Delhi 2019)
4) Chore, Nitesh Use of Social Media in Academic Libraries (Journal: IP Indian Journal of Library Science and Information Technology. 2023)
5) Gaur,Sanjay Digital Literacy and Social Media (Yking Books, Jaipur 2024)
6) N-List